महाराष्ट्र चॅप्टर

# महाराष्ट्र वार्ता पत्र

## जानेवारी २०१६

**११**

(खाजगी वितरणासाठी ई वार्तापत्र)

फेडरेशन ऑफ फिल्म सोसायटीज ऑफ इंडिया (पश्चिम विभाग)

न्यु नायगांव मुनिसिपल स्कूल, रु. नं.२, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई - ४०० ०१४ ● दूरध्वनी ०२२-२४१३३१९१● Email : ffsiwr@gmail.com

### १४ वा थर्ड आय आशियायी महोत्सव

# दिलीप बापटना सत्यजित राय स्मृती पुरस्कार



किरण शांताराम, डॉ. मोहन आगाशे व उत्सवमूर्ती दिलीप बापट

**१४व्या थर्ड आय** आशियायी चित्रपट महोत्सवात कोल्हापूरच्या बाबूराव पेंटर फिल्म सोसायटीचे सचिव दिलीप बापट यांना सत्यजित राय स्मृति पुरस्कार डॉ. मोहन आगाशे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

पुरस्काराची ओळख करुन देताना महोत्सव संचालक सुधीर नांदगांवकर म्हणाले “सत्यजित रायनी या देशात चित्रपट संस्कृती प्रसाराची कल्पना मांडली आणि त्यासाठी पहिली फिल्म सोसायटी कलकत्यात स्थापन केली. त्यांच्या नावं हा पुरस्करा आम्ही महोत्सवात ठेवला आहे. कारण देशात चित्रपट संस्कृती प्रसाराचे लाइफ टाइम मिशन म्हणून काम करणारे खूप लोक आहेत. त्यांच्या कार्याचा गोरव करण्यासाठी हा पुरस्कार आहे.

यंदाचे मानकरी कोल्हपूरचे दिलीप बापट आहेत. बापटांनी १९८२ सालीच कोल्हापूरात टीएफटी फिल्म सोसायटी सुरु केली पण ८६/८७ साली रंगीत टेलीव्हिजन व व्हिडिओ यामुळे चित्रपट व्यवसायाच धोक्यात आला. प्रेक्षकच घटला या वावटळीचा फटका फिल्म सोसायटी चळवळीलाही बसला. अनेक फिल्म सोसायट्या बंद पडल्या. त्यांत बापटानाही फिल्म सोसायटी 'आर्थिक अडचणीसाठी बंद करावी लागली. पण फिल्म सोसायटी चळवळ त्यांच्या मनांत घर करून होती २००२ साली नोकरीतून मुदतपूर्व निवृत्ती घेतल्यानंतर त्यांनी पुन्हा कलामहर्षी बाबूराव पेंटर फिल्म सोसायटी सुरु केली.तोपर्यत व्हीडीओनी मारलेल्या फिल्म सोसायटी चळवळीला डीव्हीडीच्या आगमनामुळे संजीवनी मिळाली होती.

कोल्हपूर हे त्या काळात मराठी चित्रपट निर्मितीचे माहेरघर होते. पण चित्रपट संस्कृती प्रसाराचा स्पर्श शहराला अजिबात नव्हता. स्वाभाविकच फिल्म सोसायटी रुजविणे कठीण होते. बापटांनी अथक प्रयत्नांनी ३०० सदस्य मिळवले टिकवून धरले. आणि चळवळीला नवा आयाम देण्यासाठी कोल्हपूर इंटरनॅशनल महोत्सव सुरु केला. मुळात नाट्यप्रेमी दिलीप बापट यांनी “चित्रपट संस्कृती प्रसार”हे आपले जीवनध्येय ठरविले. याचाच गौरव करण्यासाठी सत्यजित राय पुरस्कार आम्ही त्यांना प्रदान करत आहोत.”

पुरस्कार प्रदानानंतर डॉ.मोहन आगशेनी फिल्म सोसायटी चळवळीचे महत्व सांगितले आणि दिलीप बापट यांच्या कार्याचा गौरव केला.

दिलीप बापट यांनी पुरस्काराबद्दल आशियायी महोत्सवाचे आभार मानतांना कोणत्या संकटातून फिल्म सोसायटी व आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव आपण टिकवून धरू शकलो त्याचे वर्णन केले.

## “वहिदा”च्या अभिनय नैपुण्याचा गौरव!

१४व्या थर्ड आय आशियायी महोत्सवाच्या उद्‌घाटन सोहळ्यात अभिनेत्री वहिदा रेहमानला रुपेरी पडद्यावरील सहज अभिनय नैपुण्याचा पुरस्कार दिग्दर्शक श्याम बेनेगल यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. अध्यक्ष स्थानी सांस्कृतिक कार्यमंत्री विनोदजी तावडे होते.



वहिदा रेहमान, श्याम बेनेगल व सांस्कृतिक कार्यमंत्री विनोदजी तावडे

**४था कोल्हापूर आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव**

# गिरीश कासारवल्लीना बाबूराव पेंटर पुरस्कार प्रदान



अमोल पालेकर - गिरीश कासारवल्ली

**कोल्हपूर** : कलामहर्षी बाबूराव पेंटर फिल्म सोसायटीचा ४था कोल्हपूर आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव १८ ते २५ डिसेंबर या सप्ताहात शाहू स्मारकमधे भरला होता.

उद्घाटन सोहळ्यात नट-दिग्दर्शक अमोल पालेकर यांच्या हस्ते कन्नड दिग्दर्शक गिरीश कासारवल्ली यांना बाबूराव पेंटर जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. कन्नड मधील समांतर सिनेमाचे एक अध्वर्यु म्हणून गिरीश कासारवल्ली यांची ओळख आहे. भारत सरकारने त्यांचा पद्श्री पुरस्कारने गौरव केला आहे.

१९७७ साली कासारवल्ली पुण्याच्या फिल्म इन्स्टिट्यूटमधून दिग्दर्शनाचा डिप्लोमा घेऊन बाहेर पडले १९७८ साली त्यांचा "घटश्राद्ध"हा पहिला चित्रपट प्रकाशित झाला. त्याला राष्ट्रपती "सुवर्णकमळ"पुरस्कार मिळाला. त्यानंतर पाचवेळा त्यांचा सुवर्ण पुरस्कारचे गौरव झाला आहे. "तबरनकथे", "माने", "ताईसाहिबा", "द्विपा", "कूर्मावतार"इ. चित्रपट.

नुकताच गिरीश कासारवल्लीनी अदूर गोपालकृष्णन यांच्यावर फिल्मस् डिव्हिजनसाठी माहितपट केला आहे.

महोत्सवात ३२ आंतरराष्ट्रीय आणि १० नवे मराठी चित्रपट दाखविण्यात आले. रोज एक तास ओपन फोरम आयोजित करण्यात आला होता, हे विषेश.

# पथेर पांचाली पर्यंतचा प्रवास...२

**कॉलेजमध्ये** मी प्रवेश केला आणि तारेतरकांमधला माझा रस दिग्दर्शकांकडे वळला. कदाचित सिनेमावरची मी दोन पुस्तके वाचली त्यामुळे हे घडले असेल. ती पुस्तके होती. पुडोव्हस्कीनची फिल्मथिएरीवरची. ग्रेटा गार्बो,मार्लीन डिट्रीच, गॅरी कूपर, कॅरी ग्रॅण्ट या नटनट्यामधला रस कमी होऊन अर्नेस्ट लुबिश, जॉन फोर्ड, विल्मम वायलर, जॉर्ज स्टीव्हन्सस या हॉलीवूड दिग्दर्शकात मी अधिक रस घेऊ लागलो. योगायोगाने याच सुमारास ब्रिटीश फिल्म इन्स्टिट्यूच्या "साइट ॲण्ड साऊंड" मासिकाचा अंक योगायोगाने माझ्या हाती आला. मी लगेच त्या मासिकाची वर्गणी भरली. साइट ॲण्ड साऊंड ने जागतिक सिनेमाचे जग माझ्यापुढे खुले केले. मी जेव्हा सिनेमा पहात असे तेव्हा तारे तारका पडद्यावर काय करत आहेत याबरोबरच कॅमेरा कोठे ठेवलेला आहे. "कट" केव्हा येतो, कथनाचा प्रवाह कसा उलगडत जाते. एका दिग्दर्शकांहून दुसऱ्या दिग्दर्शकाचे वेगळेपण कशात आहे. इ. गोष्टीत मी रमू लागलो. याबरोबरच वेस्टर्न क्लासिकल संगीतातही मला रस वाटू लागला. मला बर्थडे प्रेझेंट म्हणून टॉय ग्रामोफोन मिळाला होता. त्यावर रेकॉर्ड ऐकून पाश्चात्य संगीताचा माझा कान तयार झाला.

सिनेमा आणि संगीत या दोन छंदापायी मी अभ्यासाकडे मात्र दुर्लक्ष करत होतो. कॉलेजची पहिली दोन वर्षे मी सायन्सचा विद्यार्थी होतो. पण फिजिक्स, केमिस्ट्रीतील कूट प्रश्न मी कसेबसे निभावले. तिसऱ्या वर्षी मी भाषा विषय घ्यायचे ठरविले. पण माझ्या वडिलांचे मित्र इंडियन स्टॅटिकल



*मृयूपूर्वी सत्यजित राय यांनी "माय इयर्स विथ अपू" हे पुस्तक लिहून पूर्ण केले होते. ते पुस्तक त्यांच्या निधनानंतर दोन वर्षांनी १९९४ मध्ये प्रकाशित झाले. पुस्तकाच्या पहिल्या प्रकरणांत "पथेर पांचाली" पूर्वी आपण चित्रपट निर्मितीकडे कसे वळलो याचा हृद्य आलेख वाचायला मिळतो. त्याचा हा संक्षिप्त अनुवाद...*

इन्स्टिट्यूटमधे वरच्या हुद्यावर होते. ते म्हणाले तू जर इकॉनॉमिक्स घेऊन बी. ए. झालास तर माझ्या इन्स्टिट्यूटमधे मी तुला नोकरी देऊ शकेन. यासाठी मी बी.ए.ला इकॉनॉनिक्स विषय घेतला तर "जॉब" मिळवण्याची मला आशा होती "इकॉनॉमिक्स"घेऊन मी धडपडत दुसऱ्या वर्गात पास झालो.

बी.ओ. झालो तेव्हा मी १८ वर्षाचा होतो. आई म्हणाली नोकरी करायचे तुझे अजून वय झाले नाही. तू गुरुदेव टागोरांच्या हाताखाली शांतिनिकोतनमधे पेटिंग शीक. शांतिनिकेतन कलकत्यापासून १०० मैलावर होते. रविंद्रनाथ टागोर हे माझ्या आजोबांचे समकालीन आणि माझ्या वडलांच्या मुक्तछंद कवितांचे प्रशंसक.

आईच्या आग्रहावरून मी शांतिनिकेतनच्या कलाविभागात१९४० साली दाखल झालो.पण मला पेंटर बनायचे नव्हते.कमर्शियल आर्टिस्ट व्हायचे होते. तेथे पाच वर्षाचा कोर्स होता. तो डिप्लोमा घेणारालाच ड्रॉईंग टिचरची नोकरी मिळत असे. मला शिक्षक व्हायचे नव्हतेच.साधारणत: दोन ते अडीच वर्षातच मी शांतिनिकेतन सोडले. पाश्चात्य चित्रकार रेम्ब्रॉ, लिओनार्दो व्हिन्ची यांचा मी चहाता होतो. पण शांतिनिकेतनमधे चाइनिज लॅण्डस्केप, ओरिएंटल आर्ट, जपानी वुडकट आणि इंडियन मिनीएचर यांची ओळख झाली. तीन मित्रांबरोबर मी अजंता एलोरा आणि खजुराहो यांना भेट दिली. आणि भारतीय कलेविषयी माझी दृष्टी विस्तारली.

**(क्रमश:)**

# सोलापूर विद्यापीठात राष्ट्रीय चित्रपट सेमिनार

**सोलापूर** विद्यापीट आणि फेडरेशन ऑफ फिल्म सोसायटीज ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने "सिनेमा आणि समाज" या विषयावर ३ दिवसांचा सेमिनार २२ ते २५ फेब्रुवारी १६ ला आयोजित करण्यात आला आहे.

सेमिनारसाठी देशभरातून पेपर्स मागविण्यात आले आहेत.

विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन व जर्नालिझम डिपार्टमेटतर्फे हा सेमिनार आयोजित केला आहे.

● हे ई वार्तापत्र संपादक-मुद्रक सुधीर नांदगांवकर यांनी फेडरेशन ऑफ फिल्म सोसायटीज ऑफ इंडिया साठी प्रकाशित केले. ●